प्रत्येकाने आपल्या दारासमोरचा कचरा जरी काढला तरी सगळं जग स्वच्छ होऊन जाईल.
– मदर तेरेसा.

॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे
www.veerbhuminews.com

▮ अहिल्यानगर ▮ शुक्रवार, दि. १५ नोव्हेंबर २०२४ ▮ वर्ष ५ वे ▮ अंक २३३ वा ▮ पाने ४ ▮ किंमत ३ रुपये ▮ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145



आता राहा प्रत्येक क्षणाला अपडेट
'वीरभूमी'च्या बातम्या आपल्या बोटावर
आपल्या मोबाईलमध्ये प्ले स्टोअरमध्ये जावून veerbhumi ॲप डाऊनलोड करा. आणि तेथे वाचा एक महिण्याचे वीरभूमी पेपर व ताज्या बातम्या एका क्लिकवर तेही अगदी मोफत.
आता आपल्यासाठीच veerbhumi ॲप
आता बातमीबरोबरच बरेच काही
मोबाईलमधील Google Play वर जा आणि सर्च करा veerbhumi




विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्याने जातीपातीचे राजकारण सुरु

पान क्र. २ वर



महाआघाडीची सत्ता असतांना आरक्षण का दिले नाही?

पान क्र. ३ वर



जास्त निधी, मोठी जबाबदारी देतो, आशुतोषला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या

पान क्र. ४ वर

## SPOT NEWS

### एमपीएससीच्या निकालास विलंब, परीक्षार्थी अस्वस्थ

● **नागपूर** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने अन्न सुरक्षा अधिकारीपदासाठी फेब्रुवारी २०२४ मध्ये मुख्य परीक्षा घेण्यात आली. मात्र, दहा महिन्यांचा कालावधी उलटूनही परीक्षेचा निकाल जाहीर न झाल्याने विद्यार्थ्यांची चिंता वाढली आहे. आयोगाकडून सातत्याने परीक्षा, निकालात होत असलेल्या विलंबामुळे विद्यार्थी मानसिक तणावात आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने फेब्रुवारी-२०२३ रोजी अन्न व औषध प्रशासन सेवेतील अन्न सुरक्षा अधिकारी (गट ब) पदाबाबत जाहिरात काढली. जाहिरातीनंतर 'अन्न सुरक्षा अधिकारी' पदाबाबत शैक्षणिक अर्हतेचा गोंधळ निर्माण झाला होता. हे प्रकरण प्रशासकीय न्याय प्राधिकरणाकडे (मॅट) गेले होते. त्यानंतर ५ जून २०२३ मध्ये उमेदवारांची पूर्व परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेचा निकाल १५ सप्टेंबर २०२३ ला जाहीर झाला.

### दुचाकीस्वाराचे दीड कोटी आयोगाकडून जप्त

● **नागपूर** – रोकड एका ठिकाणावरून दुस-या ठिकाणी नेली जात असल्याची टीप पोलिसांना मिळाली. त्या आधारावर तहसील कर्मचारी, पोलिसांच्या पथकाने सापळा लावून कारवाई केली. यात १ कोटी ३५ लाख रुपये दुचाकीने नेले जात असताना बॅगमधून मिळून आले. तसेच वाशिम शहर पोलिसांनी १२ नोव्हेंबर रोजी एका व्यापा-याकडून २५ लाखांची रोकड जप्त करून जिल्हा कोषागारात जमा केली. नागपूरमधील सेंट्रल अव्हेन्यू रोडवर दुचाकीस्वार जात असताना पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले. यावेळी त्याच्याकडे विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र त्याच्या बॅगेमध्ये १ कोटी ३५ लाख ५९ हजार रुपये मिळून आले. या पैशांचा कोणताही खुलासा ते करु शकले नाहीत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्या पैशांचा गैरवापर होण्याचा संशय पोलिसांना आला. त्यामुळे ही रोकड जप्त करुन आचारसंहिता सुरू असल्याने निवडणूक विभागाच्या स्वाधीन करण्यात आली. राज्य व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे राज्यभरात कारवाईचे सत्र सुरु आहे.


# उद्धव ठाकरेंची श्रीगोंदा येथे तिसऱ्यांदा बॅग तपासली

## निवडणूक अधिकाऱ्यांकडून नेत्यांच्या बॅगा तपासणी सुरुच । सोमवारी प्रचाराची सांगता

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

विधानसभा निवडणूक मतदानाला अवघे सहा दिवस बाकी असताना आणि प्रचारासाठी चार दिवस शिल्लक असताना राजकीय नेत्यांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते प्रचारासाठी राज्यभर दौरे करताना दिसत आहेत. या दौऱ्यात नेत्यांच्या बॅग तपासण्यात येत आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची श्रीगोंद्यात तिसऱ्यांदा बॅग तपासण्यात आली आहे. या अगोदर दोनवेळा ठाकरेंची बॅग तपासल्यानंतर काल एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या बॅगचीही तपासणी करण्यात आली होती.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराने जोर धरला आहे. प्रचारासाठी विविध पक्षांचे नेते राज्यभर दौरे करत आहेत. याच दौऱ्या दरम्यान, यवतमाळ येथे पहिल्यांदा उद्धव ठाकरेंची बॅग तपासल्यानंतर आज पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंची श्रीगोंदा येथे तिसऱ्यांदा बॅग तपासण्यात आली. यावेळी स्वत: उद्धव ठाकरेंनी व्हीडीओ शूट करत निवडणूक अधिकाऱ्यांची चौकशी केली. तुमचे नाव काय? कुठून आलात? कधीपासून काम करताय?





अशी चौकशी केली. तसेच याआधी कुणा-कुणाच्या बॅगांची तपासणी केली आहे का? असे सवाल उद्धव ठाकरेंनी निवडणूक अधिकाऱ्यांना विचारले.

उद्धव ठाकरे हेलिपॅडवर हेलिकॉप्टरमधून उतरल्यानंतर निवडणूक अधिकारी अनेक नेत्यांच्या बॅग तपासताना दिसताहेत. पहिल्यांदा उद्धव ठाकरे यांची यवतमाळमधील वणी येथे बॅग तपासण्यात आली होती. यानंतर हा व्हीडीओ मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. फक्त माझी एकट्याचीच बॅग तपासू नका, तर मोदी-शहा, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्याही बॅग तपासा आणि तो व्हीडीओ मला पाठवा, असे उद्धव ठाकरेंनी निवडणूक अधिकाऱ्यांना खडसावले होते.

यानंतर एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह अनेक नेत्यांच्या बॅगा तपासण्यात येत आहेत. दरम्यान, आज तिसऱ्यांदा उद्धव ठाकरेंची श्रीगोंदा येथे बॅग तपासण्यात आली.

### काही लोकांना प्रत्येक गोष्टीचे भांडवल करण्याची सवय

■ माझी बॅग उद्धव ठाकरे यांच्या अगोदर तपासल्या गेली. त्याचा व्हिडिओ आपण सगळ्यांनी बघितला आहे. आजही मी येथे उतरलो, तर माझी बॅग तपासण्यात आली आहे. सगळ्यांच्या बॅगा तपासल्या जात आहेत. फक्त काही लोकांना प्रत्येक गोष्टीचे भांडवल करण्याची सवय असते. निवडणूक काळात पोलीस विभागाचे हे काम आहे. वर्षानुवर्षे हे चालत आलेले आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची बॅग तपासली, माझी तपासली, सगळ्यांच्याच बॅगा तपासल्या जात आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## कारखान्याची धुराडी आजपासून पेटणार

● **मुंबई । वीरभूमी–**

साखर आयुक्तालयाने कारखान्यांना गाळप परवाने देणे सुरू केल्यामुळे गाळप हंगाम कधी सुरू होणार या विषयीची अनिश्चितता संपली आहे. शुक्रवारपासून (१५ नोव्हेंबर) कारखान्यांची धुराडी पेटणार आहे. यंदाचा साखर हंगाम दिवाळीमुळे अगोदरच पंधरा दिवस उशिराने सुरू होत आहे. त्यात राज्य सरकारने निवडणूक आयोगाला पत्र पाठवून निवडणुकीनंतर हंगाम सुरू करण्याची विनंती केली होती.

त्यामुळे साखर हंगामाबाबत संभ्रम निर्माण झाला होता. खासगी, सहकारी साखर कारखान्यांच्या दबावामुळे सरकारला नमते घ्यावे लागले असून, आयुक्तालयाने गाळप परवाने देणे सुरू केले आहे. साखर आयुक्तालयाकडे यंदाच्या गाळप हंगामात २०४ खासगी आणि सहकारी साखर कारखान्यांनी गाळप परवाना मागितला होता. त्यापैकी ज्यांनी



कागदपत्रांची पूर्तता केली, शुल्क भरले, अशा कारखान्यांना गाळप परवाना दिला जात आहे. गुरुवारी दुपारपर्यंत ८० आणि सायंकाळपर्यंत शंभरहून जास्त कारखान्यांना गाळप परवाना देण्यात आला. त्यामुळे राज्यात कारखान्यांची धुराडी पेटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## विधानसभा निवडणुकीमुळे राज्यातील शाळांना तीन दिवस सुटी?

● **पुणे । वीरभूमी–**

राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या अनुषंगाने १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे शाळा भरविणे शक्य नसल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबत निर्णय घेण्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले आहेत.

दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि प्रत्यक्ष मतदानाच्या प्रक्रियेत शिक्षकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. तसेच अनेक मतदान केंद्रेही शाळांमध्ये असतात. मतदानासाठीची तयारी करण्यासाठी निवडणूक प्रशासन शाळा ताब्यात घेते. या पार्श्वभूमीवर १८, १९ आणि २० नोव्हेंबर रोजी शाळांना सुटी देण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तालयाने शिक्षण विभागाला सादर केला होता. या अनुषंगाने शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी परिपत्रकाद्वारे शिक्षण आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरळीतपणे पार पाडण्यासाठी शिक्षकांच्या निवडणूक कर्तव्यामुळे ज्या ठिकाणी शाळा भरवणे शक्य नसेल, त्या ठिकाणी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळा बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत आयुक्त स्तरावरून आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात, असे नमूद करण्यात आले आहे.

शाळांतील बहुसंख्य शिक्षकांना निवडणुकीची कामे करावी लागत असल्याने शाळेत शैक्षणिक कामकाज होऊ शकत नाही. तसेच काही ठिकाणी शाळांमध्ये मतदान केंद्र असते. त्यामुळे त्या ठिकाणीही पूर्वतयारी करावी लागते. या संदर्भात शाळा व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासन यांनी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेणे उचित ठरेल. मात्र, सरसकट सुटी देणेही योग्य ठरणार नाही, असे काही शिक्षकांचे मत आहे.

# देशातील पहिली सॅटेलाईट टू डीव्हाईस सर्व्हिस लॉन्च


## आता नेटवर्कशिवायही करू शकाल कॉल अतिदुर्गम भागातही कनेक्टिव्हिटी मिळणार

● **नवी दिल्ली । वीरभूमी–**

भारत संचार निगम लिमिटेल अर्थात बीएसएनएलने देशात पहिली सॅटेलाईट टू डीव्हाईस सर्व्हिस सुरू केली आहे. या मुळे देशातील अतिदुर्गम भागातही कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. दूरसंचार विभागान बुधवारी यासंदर्भात घोषणा केली. तसेच, ही सेवा अमेरिकन कंपनी व्हायासॅटच्या सहकार्याने सुरू करण्यात आली असून या नवीन तंत्रज्ञानाचा उद्देश, ज्या भागांत सामान्य मोबाइल नेटवर्क पोहोचत नाही तेथे कनेक्टिव्हिटी पोहोचवणे आहे, असेही सांगितले.

आजही भारताच्या अनेक भागांत जिओ, एअरटेल, वोडाफोन-आयडिया सारख्या कोणत्याही टेलिकॉम कंपनीचे नेटवर्क पोहोचलेले नाही. ज्यामुळे तेथील लोकांना टेलिकॉम कनेक्शनचा लाभ घेता येत नाही. यापासून ते वंचित राहतात. असे साधारणपणे डोंगराळ आणि जंगली भागात घडते. लोकांच्या या समस्येवर मात करण्यासाठी, बीएसएनएलने भारतात प्रथमच सॅटेलाइट-टू-डिव्हाइस सेवा सुरू केली आहे. याच्या सहाय्याने लोक फोन नेटवर्कशिवायही टेलिकॉम कनेक्टिव्हिटीचा वापर करू शकतील.

महत्वाचे म्हणजे, सॅटेलाइट-टू-डिव्हाइस सेवेची चाचणी पूर्ण झाली आहे आणि ती विविध आव्हानात्मक भागांतही स्थिर कनेक्शन प्रदान करण्यास सक्षम आहे, असे बीएसएनएलने म्हटले आहे. तसेच, दूरसंचार विभागाने एक्स वर पोस्ट



करत यासंदर्भात घोषणा केली आहे. बीएसएनएलचे हे नवे पाऊल भारतात सॅटेलाइट कम्युनिकेशन सर्वसामान्य जनतेसाठी सोपे आणि सुलभ बनवेल.

### यूपीआय पेमेंटही करू शकणार

■ बीएसएनएलचे हे सॅटेलाइट नेटवर्क युजर्सना इमरजन्सी कॉल्स, रडर मॅसेज, एवढेच नाही तर यूपीआय पेमेंट्ससाठीही मदद करेल. मात्र, ही सुविधा सामान्य कॉल्स आणि एसएमएससाठी उपलब्ध असेली की नाही? हे कंपनीने स्पष्ट केलेले नाही. याशिवाय, ग्राहक या सर्व्हिसचा लाभ कशा पद्धतीने घेऊ शकतील, हे देखील बीएसएनएलने अद्यापपर्यंत सांगितलेले नाही.

SPOT NEWS

## काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची उद्या शिर्डीमध्ये जाहीर सभा

● **शिर्डी । वीरभूमी–**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या महासचिव प्रियंका गांधी अहमदनगर जिल्ह्यात प्रथमच येत असून शिर्डी येथे शनिवार दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. दौलत बाग, नगर मनमाड हायवे, साकुरी येथे त्यांची भव्य जाहीर सभा होणार आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय महासचिव प्रियंका गांधी या अहमदनगर जिल्ह्यात प्रथमच येत असून त्या शिर्डी येथे साईबाबा मंदिरात दर्शन घेणार आहेत. त्यानंतर सकाळी १०.३० वा. दौलतबाग, नगर मनमाड हायवे ,साकुरी येथील भव्य मैदानावर त्या शिर्डी मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार सौ प्रभावती ताई घोगरे व अहमदनगर जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे सर्व उमेदवार यांच्या प्रचारार्थ जाहीर सभा घेणार आहेत. यावेळी काँग्रेस पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात, माजी मंत्री आमदार प्राजक्त दादा तनपुरे, आमदार शंकरराव गडाख, हेमंत ओगले, संदीप वर्पे, अमित भांगरे यांसह खासदार निलेश लंके, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा आमदार डॉ सुधीर तांबे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके ,पैलवान रावसाहेब खेवरे, बाळासाहेब गायकवाड, आदींसह अहमदकर जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या विजय निर्धार सभेसाठी उत्तर अहमदनगर जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने नागरिक व महिला उपस्थित राहणार असल्याने महाविकास आघाडीच्या वतीने दौलत बाग येथील मैदानावर जय्यत तयारी करण्यात येत आहे.

# विरोधकांकडे विकासाचे मुद्दे नसल्याने जातीपातीचे राजकारण सुरु

## आ. मोनिका राजळे । वरुर, भगूर, ढोरजळगाव, आव्हाणे परिसरात गाव संवाद दौरा

● **शेवगाव । वीरभूमी–**

विरोधकांनी ताजनापूर योजनेवर चर्चा सुरु केली की समजून जायचे निवडणूक आली आहे. निवडणूक प्रचारात गावासाठी काय दिले, काय करणार हे न सांगता, जातीपातीचे राजकारण सुरु करायचे. त्यांच्याकडे विकासकामांचे मुद्दे नसल्याने, वेगळ्या विषयाकडे निवडणूक घेऊन जायची, विकासाच्या मुद्द्याला बगल द्यायची, दहा वर्षात तालुका मागे पडला म्हणायचा, जर तुम्ही दहा वर्षात मतदारसंघात फिरले असते तर विकासकामे दिसली असती. तुमच्या खोट्या प्रचाराला नागरिक थारा देणार नाहीत, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.



महायुतीच्या उमेदवार आमदार मोनिका राजळे यांनी तालुक्यातील ठाकूर निमगाव, कुरुडगाव रावतळे, वरुर, भगुर, आव्हाणे, दिंडेवाडी, बऱ्हाणपुर, मळेगाव, भातकुडगाव, आखतवाडे, आपेगाव, गरडवाडी, ढोरजळगाव, सामनगाव, लोळेगाव आदी गावातील नागरिकांशी संवाद साधला, यावेळी त्या बोलत होत्या.

वरुर येथे झालेल्या कार्यक्रमात दिनकर महाराज अंचवले, भिमराव फुंदे, सचिन म्हस्के, भानुदास सोनटक्के, मारुती लव्हाट, विठ्ठल झिरपे, केशव म्हस्के, गणपत शिंदे, संजय देवडकर, संजय मोरे, बाबासाहेब धायतडक, प्रकाश म्हस्के, भागवत झिरपे, भाऊसाहेब वावरे, किसन म्हस्के, संजय मोरे, दीपक भुसारी, बापुनाना पिसोटे, रवींद्र वायकर, आशाताई गरड, मारुती खांबट, गणेश म्हस्के, अंबिका लव्हाट, अजिंक्य लव्हाट आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलतांना राजळे म्हणाल्या, कारखान्याला मदत हवी होती, त्यावेळी अजितदादांच्या गटात आले. दिडशे कोटी रुपये निधी मिळाला, लगेच पलटी मारली. त्यांनी देखील यापूर्वी तालुक्याचे प्रतिनिधित्व केले, त्यांच्या कार्यकाळात बसस्थानक, शहर पाणीयोजना, ताजनापूर योजना, रस्ते, आदी प्रश्न होते. इतक्या वर्षापासून महिलांचे पाण्यासाठीचे सुरु असलेले हाल त्यांना दिसले नाहीत. मी महिला असल्याने त्यांचे दुःख वेदना मला जाणवल्या. त्यामुळे प्राधान्याने पाणी प्रश्नावर पाठपुरावा करुन पाणीप्रश्न मार्गी लावला. बसस्थानक, विविध रस्त्यांचे कामे मार्गी लावली. त्यावेळी त्यांना हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कोणीही अडवले नव्हते. प्रत्येक गावात किमान एक कोटी निधी देऊन विविध प्रश्न मार्गी लावले. क्वचित एखाद्या गावाला कोटी पेक्षा कमी निधी मिळाला असेल. पण भेदभाव न करता जनतेचे हित लक्षात घेऊन कामे केल्याचे आमदार मोनिका राजळे म्हणाल्या.

# श्री साई मंदिर व परिसरात फुले विक्रीस परवानगी

● **शिर्डी । वीरभूमी–**

२०२३ मध्ये साईबाबा विश्वस्त व्यवस्थापन समितीकडून दाखल करण्यात आलेल्या ठरावानुसार तसेच तालुक्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर झालेल्या सुनावणीनंतर श्री.साई मंदिर व परिसरात फुले विक्रीस उच्च न्यायालयाने आज परवानगी दिल्याने फुल उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याचे मोठे यश मानले जात आहे.

कोव्हीड संकटापासून साई मंदिरात फुले नेण्यास बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे फुल आणि हार विक्रेत्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत होते. यासाठी शासनस्तरावरही मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांच्या माध्यमातून या प्रश्नाचा पाठपुरावा सुरु होता. संस्थानवर कार्यरत असलेल्या त्रिसदस्यीय समितीकडे याबाबतची मागणी करण्यात येत होती. मात्र निर्णय होत नसल्यामुळे फुल उत्पादक शेतकरी अनुक्रमे कचेश्वर चौधरी, अर्जुनराव चौधरी, संदिप गोर्डे यांनी न्यायालयात याचिका दाखल केली होती. तर साईबाबा संस्थानच्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी ठराव करुन, कर्मचारी पतपेढीच्या माध्यमातून रास्त दरात फुल विक्री करण्याची परवानगी मिळावी, असे म्हणणे न्यायालयात मांडले होते.

यापुर्वीही या प्रकरणाची सुनावणी उच्च तसेच सर्वोच्च न्यायालयात झालेली होती. फुल उत्पादक शेतकरी तसेच फुल उत्पादक तसेच विक्रेत्यांच्या मागणीची सामाजिक दृष्टीकोनातून विचार होण्यासाठी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वच स्तरांवर आपला पाठपुरावा सुरुच ठेवला होता. आज छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी होवून न्यायालयाने श्री.साईबाबा मंदिर व परिसरामध्ये फुले विक्रीस परवानगी देण्याचा निर्णय दिल्यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

या सुनावणी प्रसंगी फुल उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने ज्येष्ठ विधीज्ञ विनायकराव होन, संस्थानच्या वतीने विधीज्ञ बजाज आणि शासनाच्या वतीने विधीज्ञ सुभाष तांबे यांनी बाजू मांडली.

दरम्यान या झालेल्या निर्णयाबद्दल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांचे फुल उत्पादक शेतकरी आणि विक्रेत्यांनी अभिनंदन करून जल्लोष केला. शिर्डी शहरात फटाक्यांची अतिषबाजी करून या निर्णयाचे स्वागत केले. फुल विक्रेत्यांनी मंत्री विखे यांचे शिर्डी विमानतळावर जल्लोषात स्वागत करून त्यांचे आभार मानले.



### पाठपुराव्याला यश : विखे पाटील

■ मंदिर आणि परिसरात फुल विक्री बाबत उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे आपण स्वागत करीत असून, या निर्णयामुळे तालुक्यातील फुल उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मागील काही वर्षात फुल उत्पादक शेतकऱ्यांचे झालेल्या आर्थिक नुकसानीचे गांभिर्य न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले होते. यासाठी करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

# शेवगावात मतदान कर्मचाऱ्यांना द्वितीय प्रशिक्षण

## ३१ गैरहजर कर्मचाऱ्यांना नोटीसा । १३६५ कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान

● **शेवगाव । वीरभूमी –**

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघ निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या १६०२ केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना द्वितीय प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणासाठी ३१ कर्मचारी गैरहजर होते. या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस काढून लोकप्रतिनिधित्व अधिनियम कायद्यानुसार कार्यवाही प्रास्तावित करण्यात आली आहे. प्रशिक्षणासाठी उपस्थित असलेल्या १३६५ कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान करून घेण्यात आले.

शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातील ३६८ केंद्राकरिता ४०८ मतदान केंद्राध्यक्ष १२२५ मतदान अधिकारी नियुक्ती करण्यात आलेले होते. या कर्मचाऱ्यांना शेवगाव शहरातील त्रिमूर्ती हायस्कूल मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणासाठी ३९६ मतदान केंद्राध्यक्ष तर १२०६ मतदान अधिकारी असे १६०२ कर्मचारी प्रशिक्षणासाठी उपस्थित होते. गैरहजर असलेल्या बारा मतदान केंद्राध्यक्ष व १९ मतदान अधिकारी अशा ३१ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस काढून लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये कार्यवाही प्रास्ताविक करण्यात आली आहे.



प्रशिक्षण वर्गात उपस्थित सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना मतदानाच्या दिवशी करावयाची कार्यपद्धती, ईव्हीएम व व्ही व्ही पॅड हाताळणीचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच उपस्थित मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे टपाली मतदान करून घेण्यात आले. त्याकरिता चार टपाली मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली होती. त्यात १३६५ मतदान झाले आहे.

या प्रशिक्षण वर्गास शिर्डी येथील अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रसाद मते, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रशांत सांगडे, तहसीलदार उद्धव नाईक, विजया घाडगे, दिग्विजय पाटील, गौरी कट्टे आदी अधिकारी उपस्थित होते.

# २४ वर्षांनी भेटले बालमित्र, रंगला आठवणींचा उजाळा

● **पारनेर । वीरभूमी –**

त्या काळात शिक्षणासाठी संघर्ष करावा लागत एकच गणवेश घालून विद्यार्थी शाळेत येत. अतिशय गरीब कुटुंबातील विद्यार्थी असल्याने त्याची जाण आजही सर्वांच्या चेहऱ्यावर आहे. २४ वर्षांपूर्वी केलेली मेहनत व शिक्षकांनी केलेले योग्य मार्गदर्शन यामुळे सर्वच माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात चांगल्या पदावर कार्यरत असल्याने श्रेयाचे फलित झाल्याचे प्रतिपादन माजी प्राचार्य गणपतराव आंबुले यांनी केले.



यावेळी व्यासपीठावर न्यू इंग्लिश स्कूल पारनेरचे प्राचार्य अर्जुन भुजबळ, अच्युतराव जगदाळे, जयसिंगराव नरवडे, पोपटराव घोडके, मुकुंद जासूद नंदकुमार कोल्हे, धोंडीभाऊ तांबे, सिंधुबाई कोल्हे, शुभा मुळे, मनीषा जगदाळे, रवींद्र मते आदी शिक्षक उपस्थित होते.

सन १९९९-२००० इयत्ता १० च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मिळावा न्यू इंग्लिश स्कूल पारनेर येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी आंबुले बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, खडतर परिस्थितीत तुम्हाला शिक्षण देणारे आई-वडील आठवा. आज हे जे तुम्हाला प्राप्त झाले आहे ते त्यांच्या पुण्याईवर व त्यांनी केलेल्या कष्टावर झाले आहे. तुम्ही आज जे सर्वजण विविध क्षेत्रात चांगल्या उद्योग व्यवसायात नोकरीत कार्यरत आहात त्याचे सर्व श्रेय आई वडील व तुम्हाला घडवणाऱ्या सर्व शिक्षकांचे आहे. त्यामुळे आई-वडिलांची शेवटपर्यंत सेवा करा असा सल्ला त्यांनी दिला. माजी विद्यार्थ्यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी ४० हजार रुपयाची अद्यावत साऊंड सिस्टीम भेट म्हणून दिली.

यावेळी माजी विद्यार्थ्यांमध्ये शशिकांत भालेकर, संतोष सोबले, दिलीप औटी, संजय पठारे, सुहास आबुले, मारुती औटी, मुरलीधर कावरे, निलेश गांधी, सचिन गांधी, संतोष गंधाडे, रूपाली औटी, वैजंता चौधरी, संदीप पुजारी, मीनाक्षी ठाणगे, ज्ञानेश्वर मस्के, अश्विनी गणाचार्य, योगिता खेडेकर, मंगल औटी, सुधाकर कानडे, सुरेश औटी, अभिजीत शिंदे, प्रकाश पठारे, आशिष औटी, आप्पा भगत, नीता वाबळे, सविता ठोंबरे, अकील अत्तर, अजय घोंगडे, अनिल औटी, अश्विनी भिसे,वैशाली गाडे, स्मिता सोनवणे, भागवत गाडेकर, नितीन गाडगे, निलेश गाडगे, संदीप गायकवाड, प्रवीण साळवे,किशोर शहाणे प्रमिला ठोंबरे कौशल्या थोरात प्रवीण साळवे आदी उपस्थित होते.

### २४ वर्षानंतर बाकावर बसल्याचा आनंद

■ माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत एकमेकांची आपुलकीने चौकशी केली. २४ वर्षानंतर पुन्हा एकदा शाळेच्या बाकावर बसल्याचा अनेकांचे चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. गुरुजनांचा आशीर्वाद घेऊन त्यांची आस्थेने माजी विद्यार्थ्यांनी विचारपूस केली.

### शिक्षकांनी विद्यालय शिखरावर पोचवले

■ आयुष्यात अनेक शिक्षक आपणाला शिकवणारे भेटतात. मात्र घडवणारे शिक्षक देखील असायला पाहिजे. त्यावेळीचे शिक्षक तुम्हाला घडवणारे भेटले त्यांनी हे विद्यालय शिखरावर पोचवले. माजी विद्यार्थी या शाळेचे रत्न आहात तुम्हाला या शाळेने घडवले. असल्याचे मत न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य अर्जुन भुजबळ यांनी व्यक्त केले.

# महादजी शिंदे इंग्लिश मीडियमचे शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेत यश



● **श्रीगोंदा । वीरभूमी–**

क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल वाडिया पार्क, अहमदनगर येथे संपन्न झालेल्या शालेय जिल्हास्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलच्या संघाने २ सुवर्ण आणि २ रौप्यपदके मिळवून चमकदार कामगिरी केली.

१७ वर्षे वयोगटात ऋग्वेद कोथिंबिरे आणि अर्पिता गोरे यांनी सुवर्णपदक पटकावले तर यश घाडगे आणि यश पिपाडा यांनी रौप्यपदक मिळविले. तसेच आरव कुलकर्णी याने स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची १८ व १९ नोव्हेंबर रोजी अहमदनगर येथे होणाऱ्या पुणे विभागीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना विद्यालयाचे कराटे प्रशिक्षक मास्टर जयेश आनंदकर यांच्यासह क्रीडाशिक्षक सोमनाथ जांभळे यांचे मार्गदर्शन लाभले.

विभागीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल खेळाडूंचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राहुल जगताप, जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, मुख्याध्यापक दिलीप भुजबळ, इंग्लिश मीडियमच्या ज्योती भोपे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मनोहर पोटे, सदस्य रवीशेठ दंडनाईक यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षक-पालक संघाचे सर्व सदस्य, विद्यार्थी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर- ४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS



## नेवासा मतदारसंघातील अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे द्वितीय प्रशिक्षण

**● नेवासा । वीरभूमी–**

नेवासा विधानसभा मतदारसंघातील ६०० मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे द्वितीय प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणी प्रशिक्षण सत्रास निवडणूक निरीक्षक अरूणकुमार यांनी भेट देत पाहणी केली. नेवासा येथील रामलीला लॉन्स येथे दुसऱ्या सत्रातील द्वितीय प्रशिक्षण सत्र पार पडले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. संजय बिरादार, नायब तहसीलदार किशोर सानप, सोनाली मात्रे, समन्वयक अधिकारी विकास थोटे व विशाल यादव आदी उपस्थित होते. या प्रशिक्षण सत्रास निवडणूक निर्णय अधिकारी उंडे यांनी ईव्हीएम, व्हीव्हीपॅट कार्यप्रणाली, टपाली मतपत्रिका, निवडणूक कर्तव्य प्रमाणपत्र अर्ज व नमुने यांचा अहवाल भरणे, मतदान संकलन केंद्रावर ईव्हीएम तसेच मतदान साहित्य ताब्यात घेणे, सूचीनुसार साहित्य तपासणी करणे, ईव्हीएम तपासणी करणे, मतदान केंद्र उभारणी करणे, अभीरूप (मॉकपोल) मतदान घेणे याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. ज्ञानोदय इंग्लिश स्कूल येथे प्रत्यक्ष मतदान यंत्र (हँड्स ऑन ट्रेनिंग) हाताळणीचे प्रशिक्षण सत्र पार पडले. प्रशिक्षण सत्रात आतापर्यंत १ हजार ९० कर्मचाऱ्यांनी पोस्टल मतदान केले आहे.

## कवी भोलानाथ देवकर लिखित 'अंतरंगातील तरंग' काव्यसंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

**● नगर । वीरभूमी–**


कवी भोलानाथ देवकर लिखित 'अंतरंगातील तरंग' काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे यांच्या हस्ते अहिल्यानगर जिल्हा वाचनालय सावेडी शाखा येथे करण्यात आले. प्रास्ताविकात मान्यवरांचा परिचय करून देताना सिने अभ्यासक नंदकिशोर आढाव म्हणाले, रॅली उल्फ कंपनीत देवकरांसोबत अठरा वर्षाच्या सहवासामुळे गेली चाळीस वर्षापासून मैत्रीपूर्ण कौटुंबिक संबंध आजपर्यंत टिकून आहेत. लेखक व कवी कधीच कानाच्या पाळीला हस्तस्पर्श करीत करत नाहीत. आपल्या अंगभूत प्रतिभेने काव्यसंग्रह निर्माण केला. मूर्तीरूपात दिसणारा देव समोर असला तरी तो खरा भाविकांच्या हृदयात, मनात, अंतःकरणात असतोच त्याचप्रमाणे काव्यसंग्रहातील प्रत्येक कविता आशयघन असून देवकरांनी आपल्या अंतरंगातील मनोगत उलगडून दाखविले आहे. रेखाचित्रकार, ललित लेखिका स्वाती डेरेकरांनी काव्यसंग्रहाबद्दल विचार व्यक्त केले. परमपूज्य पांडुरंग शास्त्री यांचा संस्कृती विचार आणि साने गुरुजींची सोपी भाषा यांचे 'अंतरंगातील तरंग' काव्यसंग्रहात अपूर्व संगम झाला आहे, असे मनोगत जेष्ठ कवी चंद्रकांत पालवे यांनी व्यक्त केले. लेखक, कवी सुनील राऊत म्हणाले की, देवकरांनी लिहिलेल्या कविता अर्थपूर्ण, प्रबोधनात्मक आहेत. अमेरिकेतील चारस महिन्यांच्या वास्तव्यात त्यांच्या मनातील काव्यरुपी हे तरंग पुस्तकरुपात आले आहेत.

# महाआघाडीची सत्ता असतांना आरक्षण का दिले नाही?

## नरेंद्र पाटील । शेवगाव येथे अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या लाभार्थ्यांचा मेळावा

**● शेवगाव । वीरभूमी –**

महायुतीच्या सरकारच्या काळात राज्यात मराठा समाजाचे एक लाख युवकांना आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या वतीने अर्थसहाय्य देऊन नव उद्योजक बनविले. महा आघाडीचे नेते राज्यकर्ते होते, त्यावेळेस आण्णासाहेब पाटील महामंडळ शेवटच्या घटका मोजत होते. आरक्षणाचे राजकारण करणाऱ्यांनी त्यांची सत्ता असताना आरक्षण का दिले नाही. पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी मोनिका राजळे यांना पुन्हा विधानसभेत पाठवा, असे आवाहन आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले.



शेवगाव येथील मंगल कार्यालयात आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या वतीने तालुक्यातील लाभार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. यावेळी गुजरातचे आमदार महेशजी कासवाल, संकेत कळंबे, बापूसाहेब भोसले, कृष्णा राजळे, अशोकराव गायकवाड, विवेक नाईक, भीमराज सागडे, उमेश भालसिंग, सागर फडके, जे. बी. वांढेकर, महेश फलके, मराठा पतसंस्थेचे उपाध्यक्ष किशोर मरकड यांच्यासह शेकडो युवा उद्योजक उपस्थीत होते.

पुढे बोलताना नरेंद्र पाटील म्हणाले, राज्याच्या प्रत्येक तालुक्यात एक हजार उद्योजक आण्णासाहेब पाटील मंडळामार्फत तयार करण्याचा मानस आहे. महायुतीच्या सरकारच्या काळात सारथी, बार्टी महाज्योतीच्या माध्यमातून शैक्षणिक मदत मिळालेली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या व केंद्राच्या हिताचे निर्णय घेतलेले आहेत. नवउद्योजक घडविण्यासाठी पुन्हा महायुतीचे सरकार आले पाहीजे. आमदार मोनिका राजळे यांनी गेल्या दहा वर्षात चांगली विकासाची कामे केली आहेत, त्यांना पुन्हा निवडून देऊन हॅट्रीक करावी, असे आवाहन महमंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप खरड, सूत्रसंचालन सोमेश्वर शेळके यांनी केले.

## सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संघटनेच्या वतीने आमदार थोरात यांना पाठिंबा



**● संगमनेर । वीरभूमी–**

राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूक २०२४ करिता संगमनेर मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आमदार बाळासाहेब थोरात यांना तालुक्यातील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संघटनांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

या पाठिंब्याचे पत्र कर्मचारी संघटनांच्या वतीने आमदार थोरात यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष प्रमोद कुलट, उपाध्यक्ष प्रमोद गुजर, खजिनदार अनिल ढोरे, सहसचिव अरुण सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, आमदार बाळासाहेब थोरात हे सलग नव्यांदा संगमनेर विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी करत असून त्यांच्या कार्याचा अवाका मोठा आहे. सध्या संघटनेचे अनेक प्रश्न प्रलंबित असून ते आमदार बाळासाहेब थोरात यांनी सोडवावे.

यात सेवानिवृत्ती वेतन विक्रीचा, कपातीचा कालावधी पंधरा वर्षावरून दहा वर्षे करावा, केंद्र सरकारच्या सेवानिवृत्त धारकांना महागाई भत्ता घोषित होतात त्याच महिन्यापासून लागू व्हावा. तसेच दरवर्षीच्या बजेटमध्ये पूर्वग्रहलक्षी प्रभावाने महागाई भत्त्याची तरतूद केलेली असते. केंद्राप्रमाणे त्याच महिन्यात महागाई भत्ता अदा झाला पाहिजे. कोविड कालावधीतील शासनाला मदत व्हावी म्हणून १८ महिन्यांचा महागाई भत्ता थकलेला आहे तोही त्वरित मिळणे गरजेचे आहे यांसह विविध मागण्या आमदार थोरात हेच विधानसभेत सोडवू शकतात म्हणून त्यांना संघटनेच्यावतीने जाहीर पाठिंबा देत आहोत असे त्यांनी म्हटले आहे.

## पाथर्डीत आठवडे बाजारात उमेदवार, समर्थकांकडून जोरदार प्रचार

**● पाथर्डी । वीरभूमी –**

विधानसभा निवडणुकीसाठी आठवडे बाजाराची पर्वणी साधत शेवगाव पाथर्डी मतदार संघातील प्रमुख उमेदवार व त्यांच्या समर्थकांनी आज पाथर्डी शहर व बाजार पिंजून काढला. वाहनांचा गोंगाट, वाहतूक कोंडी, यामुळे खऱ्या अर्थाने वातावरण निवडणूकमय बनले होते.



शेवगाव पाथर्डी मतदारसंघात आमदार मोनिका राजळे, राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे नेते प्रताप ढाकणे, वंचित बहुजन आघाडीचे प्रा. किसन चव्हाण, अपक्ष उमेदवार चंद्रशेखर घुले व हर्षदा काकडे या उमेदवारांमध्ये प्रमुख लढत आहे. या सर्वच उमेदवारांच्या समर्थकांनी बुधवारी आठवडे बाजारची पर्वणी साधत जनावरांच्या बाजार, दैनंदिन बाजार, बाजारपेठ, शहरातील विविध उपनगरे यामधून शक्तिप्रदर्शन करत प्रचार फेऱ्या काढल्या. ढाकणे यांची सलग एकापाठोपाठ एक असलेली प्रचाराची वाहने व ध्वनी चित्रफीत असलेली गाडी व हर्षदा काकडे यांच्या रिक्षांची प्रचार फेरी चर्चेचा विषय ठरली.

कोरडगाव चौकामध्ये वंचित आघाडीचे प्रा. किसन चव्हाण व अपक्ष उमेदवार चंद्रशेखर घुले यांच्या गटातर्फे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा राजश्री घुले या दोन्ही प्रचार फेऱ्यांचा सामना झाला. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा काही काळ वाहतूक कोंडी बनली. जोरदार घोषणाबाजीने वातावरण खऱ्या अर्थाने निवडणूक मय झाल्याचे जाणवले. पुढच्या बुधवारी मतदान असल्याने प्रचाराच्या दृष्टीने हा शेवटचा आठवडे बाजार पर्वणी ठरला. ग्रामीण भागातही आता प्रचारांचा जोर वाढत असून प्रचारकांना सुगीचे दिवस आले आहेत. काही फेऱ्यांमध्ये सकाळी दिसणारे प्रचारक सायंकाळच्या प्रचार फेरीत दुसऱ्या उमेदवाराच्या गोटात मध्ये घोषणा देताना दिसतात. काही प्रचारकांनी तर रोजंदारीवरील काम सोडून प्रचार फेऱ्यांसाठी प्राधान्य दिले आहे. चहा पाणी जेवण व मानधन असा एकूण साऱ्या असल्याचे सांगितले जात असले तरी एकही प्रचारक या मोबदल्यात किती पैसे दिले जातात याची वाच्यता करत नाही. त्यामुळे आचारसंहिता कक्षाकडे कोणाला तक्रारी करता येत नाही.

सर्वच प्रमुख नेत्यांना अशा यंत्रणेची गरज असल्याने तक्रारी करण्याच्या भानगडीत सहसा कोणी पडत नाही. मात्र त्याच त्याच प्रचारकांना अलटून पालटून बघण्यात मतदारांची चांगली करमणूक होत आहे. उमेदवारांमध्ये प्रमुख तीन उमेदवार शेवगाव तालुक्यातील तर दोन उमेदवार पाथर्डी तालुक्यातील आहेत त्यामुळे आपल्या माणसाकडे बघा, असाही प्रचाराचा सूर राजकीय दिशा धूसर करणारा ठरत आहे.

# 'आम्ही जे बोलतो तेच करतो' हीच ठाकरे गॅरंटी

## उध्दव ठाकरे । उमेदवार अनुराधा नागवडे यांच्या प्रचारसभेत ठाकरेंकडून मोदी - शहांचा समाचार

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

मोदी गॅरंटी गेल्या अकरा वर्षात कोणती पूर्ण झाली. निवडणुका आल्यावर यांच्या फुसक्या गॅरंट्या सुरू होतात. शेतकऱ्याचा कणा असलेले सहकार खाते मोदी - शहांनी ताब्यात घेऊन साखर कारखानदारी मोडीत काढून खाजगी व्यक्तींच्या ताब्यात देण्याचा डाव आखला आहे. त्याला महाराष्ट्राचा शेतकरी कधीही बळी पडणार नाही, असा घणाघाती प्रहार करत माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे म्हणाले की, मी मुख्यमंत्री असताना शेतकऱ्यांनी न मागता कर्जमाफी केली. कोरोना काळात प्रत्येक व्यक्तीची काळजी घेतली. शेती, सहकार टिकण्यासाठी वेगवेगळ्या योजना प्रत्यक्ष आणल्या. माता - माऊलींच्या सुरक्षेची जबाबदारी घेतली, असे प्रतिपादन शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवार अनुराधा नागवडे यांच्या प्रचारसभेत केले.



यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, खा. फौजिया खान, सेना नेते मिलिंद नार्वेकर राष्ट्रवादी ओबीसी सेलचे राज्य अध्यक्ष राज राजापूरकर, शिव व्याख्याते व मुस्लिम - मराठा समितीचे सुभान अली, काँग्रेस जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, प्रा. शशिकांत गाडे उपस्थित होते.

यावेळी श्री. ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, आमच्या बॅगा तपासल्या जातात. पण देशाचे पंतप्रधान मोदीही एका पक्षाचा प्रचार करत आहेत की. त्यांच्याही बॅगा तपासाकी. आम्हाला जो न्याय त्यांनाही निवडणुक आयोगाने तोच लावावा. ही जी दडपशाही चालली आहे त्याला आम्ही भीक घालत नाही. उध्दवला संपवायला सगळेच निघालेत पण आमच्याच वडिलांनी वाजपेयी यांचे सरकार वाचवले. कलम ३७० लाही प्रथम आम्हीच पाठिंबा दिला होता ते हे सगळे विसरलेत. तुमच्या शेतमालाला भाव नाही. नागवडे कुटुंबाचे कौतुक करत गेल्या साठ वर्षांपासून नागवडे कुटुंब चांगला कारखाना चालवत आहेत. त्यांना दृष्ट लागावी म्हणून त्यांनी अपक्ष उमेदवार उभा केला आहे. मोदी शहांचे नाव घेत श्री. ठाकरे म्हणाले की त्यांना तुमचा सखरपट्टा नष्ट करायचा आहे. त्या दोन ठगांनी केंद्रात सहकार खाते तयार करून आपल्या कब्जात घेतले आहे. तुमच्या साखरेला हे दोन मुंगळे डसणार आहेत. कारखाने आजारी पाडून त्यांना घशात घालायचे आहेत. मी शेतकऱ्यांची कर्जमुक्ती तर करणारच आहे पण तुमच्या शेती संबंधी वस्तूंचा जीएसटी माफ करणार आहे. सध्या महीला असुरक्षित आहेत त्यांच्यासाठी स्वतंत्र महीला पोलिस ठाण्यांची निर्मिती करणार आहे.

यावेळी बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्याची पंचसूत्री धोरणे सांगितली. तसेच अपक्ष उमेदवार राहूल जगताप यांचे नाव न घेता अजूनही माघार घेण्याचे आवाहन केले.

### साजनची मोठ्या मनाची माघार : ठाकरे

यावेळी भाषणात उध्दव ठाकरे यांनी उपनेते साजन पाचपुते यांचे कौतुक करत म्हणाले की श्रीगोंद्याची जागा आम्ही साजनसाठी मागत होतो परंतु साजनने आम्हाला सांगीतले की, या जागेवर नागवडे जिंकू शकतात त्यांनाच उमेदवारी द्या. अशी मोठ्या मनाने साजनने माघार घेतली, अशी उदाहरणे दुर्मिळ असतात.

### भावी मुख्यमंत्री बाळासाहेब थोरातच : घनशाम शेलार

नुकतीच उमेदवारी न मिळाल्याने काँगेस सोडून प्रहार पक्षात व परत काँगेस पक्षात सक्रिय झालेले घनशाम शेलार यांनी अनुराधा नागवडे यांना जाहीर पाठिंबा दिला. यावेळी भाषणात श्री. शेलार यांनी शिवसेना उमेदवाराच्या सभेत बाळासाहेब थोरात यांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख केल्यावर स्वतः थोरात यांनी उध्दव ठाकरे आहेत की, असे सांगितल्यावर मोठा हशा पिकला.

प्रास्तविक ज्येष्ठ नेते बाबासाहेब भोस यांनी केले. सभेला जयंत वाघ, विक्रम राठोड, संपतराव मस्के, साजन पाचपुते, भाऊसाहेब गोरे, अरूण मस्के, श्रीगोंदा - नगर तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी, तालुक्यातील सर्व स्तरावरील पदाधिकारी व मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# जास्त निधी, मोठी जबाबदारी देतो, आशुतोषला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार । आ. आशुतोष काळेंना मंत्रीपद देण्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांचे सुतोवाच

**कोपरगाव । वीरभूमी –** आपण जे काही करतो ते या मायबाप जनतेसाठी करतो. त्यांच्यासाठी वेळ देणे आणि त्यांचे प्रश्न सोडविणे हे लोकप्रतिनिधी म्हणून आपले कर्तव्य आहे. मला नेहमीच अशी माणस आवडतात जे स्वत:साठी नाही समाजासाठी मागतात त्या कर्तबगार माणसाच्या पाठीशी मी नेहमीच उभा राहिलो आहे. तू देखील आजवर स्वत:साठी काही मागितले नाही जे काही मागतो ते या जनतेसाठी मागतो.त्यामुळे तुझ्या विकासाच्या संकल्पना सत्यात उतरविण्यासाठी आणि कोपरगाव मतदार संघाच्या विकासासाठी तुझे सर्वच हट्ट मी पूर्ण करीन, तुला कधीही निधी कमी पडू दिला नाही आणि पुढेही कमी पडू देणार नाही. आजवर तुझ्या पाठीशी होतो व यापुढेही तुझ्या पाठीशी राहील अशी ग्वाही कोपरगाव येथील डॉ.बाबासाहेब मैदानावर पार पडलेल्या जाहीर सभेत उपस्थित जनसागराच्या साक्षीने राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांनी दिली. त्याचबरोबर उपस्थित जनसमुदायाला आ. आशुतोष काळे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन करून जास्त निधी पण देतो आणि मोठी जबाबदारी पण देतो असा शब्द देवून आ. आशुतोष काळे यांना मंत्रीपद देण्याबाबत अप्रत्यक्षपणे सुतोवाच केले.

कोपरगाव येथील डॉ. बाबासाहेब मैदानावर महायुतीचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजितदादा पवार गट) अधिकृत उमेदवार आ. आशुतोष काळे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांची गुरुवार (दि.१४) रोजी जाहीर सभा आयोजित करण्यात आली याप्रसंगी ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार अशोकराव काळे होते. यावेळी व्यासपीठावर महानंदाचे माजी चेअरमन राजेश परजणे, अशोकराव रोहमारे, राजेंद्र जाधव, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ. चैतालीताई काळे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, शिवसेना जिल्हाध्यक्ष नितीन औताडे, ॲड. रविकाका बोरावके, पद्माकांत कुदळे, शेतकरी सेनेचे प्रदेशाध्यक्ष धनंजय जाधव, पुणतांब्याचे सरपंच डॉ. धनंजय धनवटे, बाळासाहेब कदम, रिपाई (अ)चे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कपिल पवार, भाजप तालुकाध्यक्ष साहेबराव रोहोम, शहराध्यक्ष दत्ता काले, जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब रहाणे, माजी नगरसेवक हाजीमेहमूद सय्यद, रिपाईचे तालुकाध्यक्ष अनिल रननवरे,सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष मनेश गाडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कृष्णा आढाव, शहराध्यक्ष सुनील गंगूले, तालुकाध्यक्ष चारुदत्तजी सिनगर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आ.आशुतोष काळे म्हणाले की, राजकारण निवडणुकीपूरतेच हि कर्मवीर शंकररावजी काळे यांची शिकवून घेवून वाटचाल करीत असतांना सर्वांना सोबत घेवून मतदार संघाचा विकास साधला आहे आणि यापुढील काळात देखील साधणार आहे. २०१९ ला निवडून आल्यानंतर पहिले दोन वर्ष कोविड महामारी असल्यामुळे निधी मिळण्यास काहीसा उशीर झाला परंतु त्यानंतर मोठ्या प्रमाणात निधी मिळविल्यामुळे यापुढील काळात विकासकामांचे फक्त लोकार्पण तसेच नवीन मंजूर करून आणलेल्या कामांचे भूमिपूजन करायचे आहे.मतदार संघाची सिंचन व्यवस्था सुधारण्यासाठी सर्वच कालवे व चाऱ्यांच्या कामाला प्राधान्य देवून ज्या प्रमाणे जिरायती भागातील गावांसाठी उजनी उपसा जलसिंचन योजना राबविली त्या धर्तीवर पालखेड कालव्याच्या लाभक्षेत्रातील गावांना ओव्हर फ्लोचे पाणी मिळावे यासाठी उपसा जल सिंचन योजना राबविण्याचा मनोदय व्यक्त करून निधी देण्याची मागणी केली. लोकसंख्या वाढीमुळे पिण्याच्या पाण्याचे आरक्षण दिवसेंदिवस वाढत असून ज्याप्रमाणे वैनगंगा पैनगंगा वळण बंधाऱ्याच्या योजनेला मान्यता दिली त्याप्रमाणे पश्चिमेला वाहून जाणारे पाणी पूर्वेला वळविण्याच्या प्रकल्पाला लवकरात लवकर पूर्णत्वाकडे न्यावे. मतदार संघातील केटी वेअरचे बॅरीकेट कम पुलाध्ये रुपांतर करून दळणवळणाला अधिक गती मिळवून द्यायची आहे. दक्षिण उत्तर एकच रस्ता असून नवीन रस्त्यांच्या निर्मितीसाठी निधी द्यावा. नवीन एम.आय.डी.सी.सुरू होत असून जास्तीत जास्त रोजगार निर्मितीसाठी व उद्योग वाढविण्यासाठी मदत करून



४३३ एकर जागेवर नवीन एमआयडीसी उभारणीसाठी सहकार्य करावे. अशा अनेक मागण्या आ. आशुतोष काळे यांनी करून मतदार संघाच्या पुढील विकासाच्या संकल्पना उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्यापुढे मांडल्या

पुढे बोलतांना उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार म्हणाले की,आशुतोषच्या रूपाने कोपरगावला उच्चशिक्षित,तरुण तडफदार व विकासाचे व्हिजन असलेलं नेतृत्व मिळाले असून त्याने पाच वर्षात आपल्या कामाचा ठसा उमटविला असून त्याचा मला अभिमान आहे. परंतु मागील वेळी त्याला अवघ्या आठशे बावीस मतांनी निवडून दिले यावेळी त्याला पंच्याऐंशी हजार मतांनी निवडून द्या. कोपरगावची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सुटल्यामुळे कोल्हे परिवाराने निवडणुकीत थांबून घेत आशुतोषला पुढे जाण्यासाठी आशीर्वाद दिले आहेत. कोल्हे कुटुंबाचे योग्य पुनर्वसन करण्याचा शब्द त्याच्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानी दिला असून मी देखील त्याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आजवर मी नेहमीच कर्तबगार माणसाच्या पाठीशी उभा राहिलो आहे. माझ्या ओठात एक आणि पोटात एक हे मला कधी जमलेच नाही आणि जमणार पण नाही. माझे बोलणे नेहमीच सडे तोड असते हे संपूर्ण राज्याच्या जनतेला नाहीत आहे.मला नेहमीच अशी माणस आवडतात जे स्वत:साठी नाही समाजासाठी मागतात. आशुतोषने देखील आजवर स्वत:साठी काही मागितले नाही जे काही मागितले ते कोपरगावच्या जनतेसाठी मागितले आहे. त्याने माझ्याकडे पोलीस स्टेशन इमारत, कर्मचारी वसाहतीसाठी निधी मागितला मी दिला. पाच नंबर साठवण तलावाची लोकवर्गणी माफ करून मागितली ती पण दिली, मंजूर बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी निधी मागितला तो पण मी दिला. वीर महाराणा प्रताप व भगवान एकलव्य यांच्या स्मारकासाठी निधी मागितला तो पण दिला.कारण या सर्व गोष्टी आशुतोषने जनतेसाठी मागितल्या. त्यामुळे आजपर्यंत माझ्याकडे जे जे मागितले ते ते आशुतोषला दिले आहे आणि आशुतोषचे सगळेच हट्ट मी पुरविले आहे. त्याने मांडलेल्या विकासाच्या सर्व संकल्पना सत्यात उतरविण्यासाठी यापुढील काळातही कोपरगावच्या मतदार संघाच्या विकासासाठी आशुतोषचे सर्वच हट्ट पूर्ण करीन. तुला जेवढे जास्त मताधिक्य मिळेल तेवढीच तुझी जबाबदारी देखील मोठी राहील याची तयारी करून ठेव असे सूचक वक्तव्य करून मंत्रीपद देण्याबाबत उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी अप्रत्यक्षपणे सुतोवाच केले. या सभेसाठी नागरिकांची मोठी उपस्थिती होती. यावेळी महायुती व मित्र पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाळासाहेबांच्या हातात राज्याचे अधिकार द्यायला हवेत

## शरद पवार । राहाता येथे प्रभावती घोगरग यांच्या प्रचारार्थ सभा

**राहाता । वीरभूमी–** आमदार बाळासाहेब थोरातांना आता निर्णयाचे अधिकार द्यायला हवेत. त्यांच्या हातात राज्य दिले तर शेतीपासून अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी येथील सभेत केले.

राहाता येथे सौ. प्रभावती घोगरे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आमदार बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, राजेंद्र फाळके, ॲड. नारायणराव कारले, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते

यावेळी बोलताना खासदार पवार म्हणाले की, महाविकास आघाडी सरकार आल्यास मुख्यमंत्री कोण होणार? यावरून बरीच चर्चा झाली. तरुणांच्या रोजगाराची मोठी समस्या आहे. शेतीत अनेक प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडवायचे असतील तर बाळासाहेब थोरातांना तुम्ही आता




निर्णयाचे अधिकार द्यायला हवेत. मी काही विधानसभेत जाणार नाही. थोरात तेथे आहेत. राज्याचा कृषिमंत्री म्हणून देशातील इतर कृषिमंत्र्यांच्या तुलनेत त्यांनी सर्वो त्तम काम केले, हे आपण पाहिले. त्यांना सहकार क्षेत्राचा मोठा अनुभव आहे.

देशात सरकार चालवण्यासाठी २७२ खासदार आवश्यक असतात मात्र ४०० पार्क नारा देऊन या लोकांच्या मनामध्ये राज्यघटना बदलाविषयी काही सुरू आहे. अशी शंका सर्वांच्या मनात निर्माण झाली. आणि त्यातून महाराष्ट्रातील जनतेने महाविकास आघाडीला मोठ्या कौल दिला. त्यानंतर या सरकारला लाडकी बहीण आठवली .खरे तर महिलांची सुरक्षितता महत्त्वाची आहे .परंतु सध्या महाराष्ट्रात मागील सहा महिन्यात ८६६ मुलींची अपहरण झाले आहे . ही मोठी शोकांतिका आहे.

राज्यातील महायुतीचे सरकार जनतेला आवडलेले नाही आणि ही महाराष्ट्राची परंपरा नाही असे सांगताना प्रभावती घोगरे सह सर्वांनी महाविकास आघाडीच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

# सर्वसामान्य गृहिणीला उमेदवारी ही लोकशाहीची ताकद, लोकसभेची पुनरावृत्ती विधानसभेत करा : सक्षणा सलगर

**पारनेर । वीरभूमी–** एक सर्वसामान्य गृहिणी विधानसभेची उमेदवार असू शकते, साडे तीन लाख लोकांचे ती विधानसभेत प्रतिनिधित्व करू शकते. हे संविधानाचे, भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या शिक्षणावर, बोलण्यावर टीका करणाऱ्यांना संविधान, लोकशाही समजलीच नाही. असा टोला राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा सक्षणा सलगार यांनी लगावला. आम्हाला प्रवरेची धुणी धुणारे लोकप्रतिनिधी नकोत तर सर्वसामान्यांच्या सुख दुःखात सहभागी होणारे, त्यांच्या हितासाठी झटणारे लोकप्रतिनिधी हवेत. खा.निलेश लंके यांना तुम्ही लोकसभेत पाठवले, त्याचीच पुनरावृत्ती करीत तुम्हाला आता राणी लंके यांना विधानसभेत पाठवायचे असल्याचे सलगार म्हणाल्या.



महाविकास आघाडीच्या उमेदवार राणी लंके यांच्या प्रचारासाठी पोखरी येथे आयोजित सभेत त्या बोलत होत्या. खा.निलेश लंके, माधवराव लामखडे, गंगाराम बेलकर, विकास रोहोकले, मारूतीराव रेपाळे, सुवर्णा धाडगे, राजू चौधरी, बापू शिर्के, बाळासाहेब खिलारी यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे शिक्षण चौथी होते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर त्यांनी महाराष्ट्राचा गाडा यशस्वीपणे हाकला. एक घरामध्ये स्वयंपाक करणारी महिला विधानसभेची उमेदवार आहे. ही लोकशाहीची खरी ताकद आहे. शेताच्या बांधावर बसलेल्या एखाद्या फाटक्या शेतकऱ्याला जे ज्ञान असते ते पदव्युत्तर शिक्षण घेणारालाही नसते. मी ज्या मतदारसंघात फिरते, त्या भागातील भाषेत, त्या स्टाईलमध्ये बोलावं लागतं. ज्याला प्रेमाची भाषा त्याला प्रेमाची भाषा. ज्याला कळत नाही त्याला हाबाडा देण्याची स्टाईल आमच्याकडे आहे, असे सांगत सलगर यांनी विरोधकांना सुनावले.

विरोधक एकाच घरात दोन पदांबाबत बोलतात.आमचे काम बोलते. आम्ही २४ तास काम करतो. कामाला महत्व आहे. तुम्ही काम करा. आज भूछत्रासारखे उगवले आणि आमच्यावर आरोप करत आहेत, अश्या शब्दात खासदार निलेश लंके यांनी विरोधकांना फटकारले.

# ढाकणेंच्या विजयासाठी कुटुंबासह कार्यकर्त्यांचा वाड्या-वस्त्यांवर प्रचार

**पाथर्डी । वीरभूमी –** शेवगाव पाथर्डी मतदारसंघात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता चांगलाच रंग चढला असून दोन्ही तालुक्यातील महाविकास आघाडीतील घटक पक्षांनी प्रचाराचा वेग वाढवला आहे. यावेळी आघाडीचा उमेदवार निवडून आणायचाच असा चंग कार्यकर्त्यांनी बांधला आहे. त्यासाठी कार्यकर्ते वाड्यावस्त्यांवर घरोघरी जाऊन मतदारांना मतदान यंत्रांचे प्रात्यक्षिक दाखवत आघाडीचे उमेदवार ॲड. प्रताप ढाकणे यांना मतदान करण्याचे आवाहन करत आहेत.

या प्रचारात कार्यकर्त्यांसोबत ॲड. ढाकणे कुटुंबातील सदस्य ही मतदारांना सहकार्य करण्याचे आवाहन करीत आहेत. यामध्ये प्रताप ढाकणे यांच्या कन्या कु. प्रणाली ढाकणे व केदारेश्वर कारखान्याचे चेअरमन ऋषिकेश ढाकणे हे मतदारांना आपल्या संघर्षशील पित्यासाठी मत मागत असताना सर्वांचे लक्ष वेधून घेत आहेत. ढाकणे यांची ही दोन्ही मुले आपल्या पित्यासाठी मोठी मेहनत व परिश्रम घेताना दिसत आहेत. ते थंडी, ऊन व नैसर्गिक वातावरणाचा कोणताही विचार न करता ही अटीतटीची व अंतिम लढाई जिंकण्यासाठी ते अहोरात्र मेहनत घेताना दिसत आहेत. तर ॲड. ढाकणे यांच्या पत्नी व माजी जिल्हा परिषद सदस्या प्रभावती ढाकणे याही प्रचारात सक्रिय असून त्याही ढाकणे यांच्या बरोबरीनेच खांद्याला खांदा लावून व पायाला भिंगरी लावून मतदारसंघात फिरताना दिसत आहेत. त्यांच्यासोबत महिला आघाडीच्या योगिता राजळे, रत्नमाला उदमले, आरती निर्हाळी, सविता भापकर, ज्योती जेधे आदी महीला कार्यकर्त्या याही प्रचंड मेहनत घेताना दिसत आहेत.

मतदार संघात सर्व घटकात, सर्व स्तरात, सर्व भागात व सर्व समाजात ड. ढाकणे यांच्या विषयी प्रचंड सहानभूती निर्माण झालेली आहे. त्यामुळे ढाकणे यांच्या प्रत्येक प्रचार दौऱ्याला मतदारसंघातून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. यावेळी ढाकणे यांना मतदान करून त्यांना संधी देऊ अशी ग्वाही निः संदिग्धपणे मतदार देताना दिसत आहे. शहरासह तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उबाठा व काँग्रेस पक्षांसह इतर सर्व छोटे पक्षातील सर्वच कार्यकर्ते सक्रिय झाले असून आपल्या भागातुन मताधिक्य देण्यासाठी ते सरसावले आहेत. तर स्वतः ढाकणे यांच्या दौऱ्यानंतर व जनतेशी साधलेल्या संवादानंतर ढाकणे यांचा प्रभाव ही दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे.

ढाकणे यांचा प्रचंड आत्मविश्वास, देहबोली व अभ्यासपूर्ण भाषण, मतदार संघातील प्रश्नांची केलेली मांडणी व अतिशय तळमळीने केलेले आवाहन यामुळे यावर्षीच्या निवडणुकीत



परिवर्तनाची लाट मतदारसंघात उमठताना दिसत आहे. विशेष म्हणजे, महाविकास आघाडीतील तिन्ही घटक पक्ष – काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वांनी आपापल्या कार्यकर्त्यांसह जोरदार प्रचार कार्य हाती घेतले आहे.